# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : diplomadesk1odte@gmail.com Internet : http://dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक** | **क्रमांक:** 10/एडीएम/पदविका/2017/३३८१

**कालमर्यादित दि. 20.05.2017** | **दिनांक:** MAY 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 करिता पहिल्या/दुसऱ्या पाळीतील अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मागील शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या अधिपत्याखालील काही संस्था मंजूर प्रवेशक्षमता व प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या सदर अभ्यासक्रमातील कार्यरत शिक्षक/कर्मचारी यांच्या वेतनाची तजवीज करणे महाविद्यालयास अत्यंत अडचणीचे जात असल्याने पहिल्या/दुसऱ्या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य म्हणजेच प्रवेश न करणेबाबत कळविण्यात येत होते.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 करिता पहिल्या/दुसऱ्या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता-केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य म्हणजेच प्रवेश न करणेबाबत आपल्या अधिपत्याखालील संबंधित संस्थेस आपल्यामार्फत खालीलप्रमाणे कागदपत्रासह प्रस्ताव या संचालनालयास दि. 20.05.2017 पर्यंत सादर करणेबाबत लेखी कळविण्यात यावे.

1. संस्थेतील पहिल्या/दुसऱ्या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करावयाची असल्यास त्याबाबत कर्मचाऱ्याची किंवा विद्यार्थ्यांच्या तक्रारी, देय असलेली देणी, न्यायालयीन प्रकरणे इ. उदभवल्यास त्यास संपुर्णपणे संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे रक्कम रु. 100/- चे स्टॅपपेपर सचिव/अध्यक्ष व प्राचार्य यांनी स्वाक्षरी केलेले नोदणीकृत मुळ हमीपत्र.
2. संस्थेतील पहिल्या/दुसऱ्या पाळीतील एखादया अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत शुन्य करणेबाबत संस्थेचा सचिव/अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीच्या ठरावाची मुळ प्रत सादर करण्यात यावी.

(**चंद्रशेखर ओक**) भा.प्र.से.
संचालक,

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१७/1187
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 18 MAY 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व संबधित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी व सदरचा प्रस्ताव या कार्यालयास दि [illegible]